# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांनी शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसोबत केले स्नेहभोजन**
- **इतर सुविधा बरोबर विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शालेय पोषण आहार उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका कटिबद्ध - मा. आयुक्त**

मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.), यांनी भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खाँ, शाळा क्रमांक 32, काशी येथे दिनांक 07 फेब्रुवारी 2024 रोजी शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसोबत स्नेहभोजन केले.

मनपाच्या एकूण 36 शाळा आहेत. या सर्व या शाळेत गरीब व गरजु विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महानगरपालिका मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, शालेय पोषण आहार, मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, बॅग व शैक्षणिक साहित्य पुरवठा करते. या सुविधांबरोबर शालेय आहार ही विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाची बाब असून याबाबत कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा होता कामा नये यासाठी मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.), यांनी भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खाँ, शाळा क्रमांक 32, काशी येथे दिनांक 07 फेब्रुवारी 2024 रोजी शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसोबत स्नेहभोजन केले. मा. आयुक्त यांच्यासोबत अति. आयुक्त संभाजी पानपट्टे, शिक्षणाधिकारी सोनाली मातेकर व शालेय मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

महापालिकेच्या 36 शाळांमध्ये मा. आयुक्त यांनी सर्व अधिकाऱ्यांना "मिड डे मिल" मध्ये मिळणाऱ्या आहाराची गुणवत्ता तपासणी, त्याची चव, दर्जा व त्या आहाराबाबत विद्यार्थ्यांचा अभिप्राय याची नोंद घेऊन अहवाल सादर करण्याची सूचना देण्यात आली होती. शालेय पोषण आहार अंतर्गत विद्यार्थ्यांना सकस आहार देण्यात यावा असे निर्देश मा. आयुक्त यांनी दिले.